छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेबाबत.. ..

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन आदेश क्रमांक : सववि-१०१७/प्र.क्र.२१८/आस्था-१
मंत्रालय (विस्तार इमारत), ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ०१ मार्च, २०१८

वाचा - १) शासन आदेश सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक सववि-१०१७/प्र .क्र.२१८/आस्था-१, दिनांक २१/६/२०१७
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३, दिनांक १७/१२/२०१६
३) शासन निर्णय सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक कृकमा ०७१७/प्र. क्र. १२७/२ स, दिनांक २८/६/२०१७
४) शासन निर्णय सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक कृकमा ०७१७/प्र. क्र. १३७/२ स, दिनांक १४/९/२०१७

शासन आदेश :-

राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ दिनांक २८/६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेली आहे. राज्य शासनामार्फत घेण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या थकित कर्जमाफीच्या सदर योजनेची अंमलबजावणी तातडीने व विहीत कालमर्यादेत करावयाची असल्यामुळे मंत्रालय स्तरावरील कामासाठी शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेले सहायक कक्ष अधिकारी, श्री. साईनाथ कुलकर्णी यांची शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: संकीर्ण २७१५/ प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१७ मधील मार्गदर्शक तरतूदींच्या अधीन राहून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून आदेशाच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात येत आहे :-

अटी व शर्ती:-

१) सदरची नियुक्ती ही नियमित स्वरूपाच्या कामकाजासाठी न करता केवळ शेतकऱ्यांच्या थकित कर्जमाफीच्या निर्णयाच्या अनुषंगाने करावयाच्या विवक्षित कामासाठीच राहील.

२) सदर नियुक्ती ही शेतकऱ्यांच्या थकित कर्जमाफी २०१७ च्या अंमलबजावणीसाठी असल्यामुळे, या कामाची व्याप्ती विचारात घेता सदर सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी, श्री. साईनाथ कुलकर्णी यांची नियुक्ती प्रथमत: ३ महिन्यांच्या कालावधीसाठी करण्यात येत आहे. या कालावधीत त्यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर कामाचा आढावा घेवून, आवश्यक असल्यास पुढे कालावधी वाढविण्याबाबत विचार करण्यात येईल.

३) विवक्षित काम हे विहीत वेळेत पूर्ण करून देण्याची संबंधित सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांची जबाबदारी राहणार असल्यामुळे त्यासंबंधीचे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून लिहून घेण्यात येईल.

४) करार पध्दतीने नियुक्तीच्या उपरोक्त सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी, श्री. साईनाथ कुलकर्णी यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते अनुज्ञेय राहतील.

५) संबंधित सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांना शासनाच्या कोणत्याही संवर्गात समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतही लाभ मिळणार नाहीत.
६) संबंधित सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही.
७) सदर नियुक्ती जरी शेतकरी कर्जमाफी २०१७ या कामासाठी करण्यात येत असली, तरी, ती कोणत्याही विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी आगावू सूचना न देता समाप्त करण्यात येईल. त्यासाठी कारणे देणे बंधनकारक राहणार नाही.
८) उपरोक्त सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांना करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीत त्यांच्यावर सोपविलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतता येणार नाही. तसेच सदर सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांनी गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहणार राहील.
९) संबंधित सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी, श्री. साईनाथ कुलकर्णी यांना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.
१०) संबंधित सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी, श्री. साईनाथ कुलकर्णी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरून प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.
११) सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी, श्री. साईनाथ कुलकर्णी यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत त्यांनी पूर्ण करणे आवश्यक राहील. उपरोक्त सेवानिवृत्त अधिका-यांनी दर महिन्याला त्यांच्या कामकाजाच्या सद्य:स्थितीची माहिती अवर सचिव तथा सहनिबंधक, सहकारी संस्था (२-स) यांचेमार्फत अपर मुख्य सचिव (सहकार) यांना सादर करणे आवश्यक राहील. अपर मुख्य सचिव (सहकार) हे वेळोवेळी आढावा घेवून सदर अधिकाऱ्यांच्या कामाचे मूल्यमापन करतील.
१२) सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी, श्री. साईनाथ कुलकर्णी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रांबाबत/ माहितीबाबत व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

२. उपरोक्त अटी व शर्तीसोबतच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिका-यांवर बंधनकारक राहतील.

३. करार कालावधीत उपरोक्त सेवानिवृत्त अधिका-यांच्या पारिश्रमिकाचा खर्च "मागणी क्रमांक व्ही-२ २४३५- इतर कृषीविषयक कार्यक्रम ००, ६०-इतर १०१-- शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी योजना (००) (०१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ (राज्य स्तर) (२४३५ ००८२) (दत्तमत) या लेखाशीर्षाखालील १०- कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखालील उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात येईल.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०३०११८०५४२२२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing Tax Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73, cn=Sudin Gaikwad
Date: 2018.03.01 18:07:05 +05'30'

(डॉ. सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा .राज्यपालांचे सचिव ,राजभवन ,मुंबई

२. मा .मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय ,मुंबई
३. मा .मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक ,मंत्रालय ,मुंबई
४. अपर मुख्य सचिव (सहकार) ,सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय ,मुंबई
५. सचिव (वस्त्रोद्योग) सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय ,मुंबई
६. अपर मुख्य सचिव (पणन), सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय ,मुंबई
७. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता) , महाराष्ट्र राज्य ,मुंबई / नागपूर
८. महालेखापाल(लेखापरीक्षा) ,महाराष्ट्र राज्य ,मुंबई / नागपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई (२ प्रती)
११. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सामान्य प्रशासन विभाग (१३) ,मंत्रालय ,मुंबई
१३. श्री. साईनाथ कुलकर्णी, सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी,
१४. अवर सचिव (श्री. आर. एस. शिंगटे), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. कार्यासन अधिकारी (२ स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. उप सचिव (आस्थापना) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय ,मुंबई
१७. निवड नस्ती आस्था-१.